सं.फौ.प्र.क्र.५०१/२०२१
सरकार -वि. शेख अब्दुल्ला
**निशाणी क्र.१० खाली**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव – पो. कॉ. सलिम बिलावर बरडे, ब.नं.२३९५
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा. - पोलीस मुख्यालय बुलढाणा, जि.बुलढाणा.

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्रीमती.आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. दि.०८.०६.२०२१ रोजी मी मलकापुर शहर पोलीस स्टेशनला कार्यरत असतांना गुप्त बातमीदाराकडून माहीती मिळाली की, एक इसम हा पारपेठ, मलकापुर येथे रेल्वे पुलाखाली सार्वजनिक ठिकाणी वरली मटका नावाचा जुगार लोकांकडून पैसे घेवून खेळत व खेळवित आहे. अशा माहीतीवरून मी पोलीस स्टाफसह व पंचांसोबत घटनास्थळी गेलो असता तो इसम त्याच्या जवळील असलेल्या कागदावर लिहून लोकांकडून पैसे स्वीकारून चिठ्ठया देत असतांना मिळून आला. आम्ही तेथे छापा टाकला असता त्याच्याजवळ असलेले इतर लोक पळून गेले व इसमाला पकडले. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख अब्दुल्ला शेख बिस्मील्ला असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून ५५० नगदी रूपये, एक चिठ्ठी व बॅल पेन असा मुद्देमाल मिळून आला. त्यानंतर तेथे पीएसआय छाया वाघ यांनी घटनास्थळासहीत जप्ती पंचनामा तयार केला व मी पोलीस स्टेशनला येवून लेखी फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१५</u>** देण्यात आला. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **<u>निशाणी क्र.१६</u>** देण्यात आला. मी आरोपीला ओळखतो तो आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास-आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.जी.इंगळे यांचेमार्फत सुरु....</u>**

०२. मी ज्यावेळेस छापा मारण्याकरिता गेलो होतो त्यावेळी मी स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे की, तेथे लोकांचे येणे जाणे चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, केसेसचा कोटा

पूर्ण करण्याकरिता आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणता व्यक्ती कोणत्या आकड्यावर पैसे लावत होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तथाकथीत घटना पाहिली नसल्यामुळे तसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.08.13 17:24:31 +0530

दिनांक : १३/०८/२०२६

**(पी.एस.ठाकरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,मलकापूर